# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

**तक्रार क्रमांक- ५८२/२०२५/जळगाव**

**व्दितीय अपील क्र.- २३६९/२०२५/जळगाव**

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १. | श्री. योगेश मोहन पवार, रा. श्रीकृष्ण कॉलनी, पैलाड, ता. अमळनेर,जि.जळगाव | तक्रारदार |
| | विरुद्ध | |
| १. | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुऱ्हे बु., ता. अमळनेर,जि.जळगाव | उत्तरवादी क्र.१ |
| २. | सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, अमळनेर, ता. अमळनेर, जि.जळगाव | उत्तरवादी क्र.२ |

(निर्णय-दिनांक०१/०७/२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक ०३/११/२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. आयोगाने व्दितीय अपील क्रमांक २३६९/२०२५/जळगाव संदर्भात दिनांक २३/०५/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक १९/०९/२०२५ अन्वये आदेश पारीत केलेला आहे. तथापि, सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुऱ्हे बु., ता. अमळनेर,जि.जळगाव यांनी अपूर्ण,मोघम व दिशाभूल करणारी माहिती पुरविली असून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत परीपूर्ण माहिती पुरविली नसल्याची तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रार दाराला वसार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध अभिलेखावरुन आयोगाच्या असे निदर्शनास येते की, आयोगाने व्दितीय अपील क्रमांक २३६९/२०२५/जळगाव संदर्भात दिनांक २३/०५/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक १९/०९/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर तक्रारदार यांना पुरविणे अभिप्रेत होते.मात्र तसे केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचचायत कार्यालय, कुऱ्हे बु., ता. अमळनेर,जि.जळगाव यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दितीय अपील क्रमांक २३६९/२०२५/जळगाव संदर्भात दिनांक २३/०५/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी. उपमुख्य कार्यकारी अधिकारी-पंचायत विभाग,जिल्हा परीषद कार्यालय, **जळगाव**, ता. जि. **जळगाव** यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह तक्रार क्र. ५८२/२०२५/ **जळगाव** अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**( प्रकाश इंदलकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

---

तक्रार क्रमांक-५८२/२०२५/ **जळगाव** /जावक क्र. 592 दिनांक- 06/07/2026

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद कार्यालय,जळगाव, ता.जि.जळगाव

२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी-पंचायत, जिल्हा परीषद कार्यालय,जळगाव, ता.जि.जळगाव

२)निवडनस्ती.